**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JAN-FEB, 2020, VOL- 7/57*

# जागतिकीकरण: ग्रामीण समाजासमोरील आर्थिक आव्हाने एक समाजशास्त्रीय अभ्यास-संदर्भ सांगली जिल्हा

**सुजाता कराडे, Ph. D.**
*सहयोगी प्राध्यापक, विभाग प्रमुख, समाजशास्त्र, श्रीमती सी. बी. शाह महिला महाविद्यालय, रतनशीनगर, सांगली.*

*Scholarly ResearchJournal's* **is licensed Based on a work at** *www.srjis.com*

भारत हा खेडी प्रधान व शेतीप्रधान देश आहे. त्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती व्यवसायाला खूप महत्त्व आहे. देशाचा आर्थिक विकास हा शेती, उद्योग आणि व्यापार या तीन क्षेत्रावर अवलंबून आहे. भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये शेती क्षेत्र महत्त्वपूर्ण मानले असल्याकारणाने शेतीचे उत्पादन हे राष्ट्रीय उत्पन्नाचा महत्त्वपूर्ण भाग आहे. स्वातंत्र्यपूर्व काळात भारतीय शेती मागासलेली होती. 1951 ते 52 मध्ये पंचवार्षिक योजना अमलात आणली. या पंचवार्षिक योजनांच्या माध्यमातून शेतीच्या विकासाकडे लक्ष देण्यात आले. ग्रामीण समाजाचा विकास करण्यासाठी शेतीचा आर्थिक विकासातील क्रियाशील सहभाग हा शेतीला महत्त्व प्राप्त करून देणारा ठरला. यामुळे शेतीचा विकास हाच ग्रामीण समाजाचा विकास हे माणूस शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू मानला. त्यामुळे देशाचा आर्थिक विकास हा भविष्यकाळातही शेतीवर कायम राहणार आहे.

ग्रामीण समाजाचा विकासाकडे स्वातंत्र्यानंतर लक्ष देवू जाऊ लागले. ग्रामीण समाजाचा विकास करणे मध्ये ग्रामीण अर्थव्यवस्था सुधारणे याकरिता पंचवार्षिक योजना, समाज विकास योजना, पंचायत राज्य पद्धती, जमीन सुधारणा, दळणवळण, मनरेगा, यासारख्या योजना राबवण्यास सुरुवात केली. "भारतीय नियोजन मंडळाच्या मते च्या प्रक्रियेमुळे ग्रामीण जनतेच्या आर्थिक व सामाजिक जीवनात सुधारणा घडवून आणले जाते ती प्रक्रिया म्हणजे ग्रामीण विकास होय."

(पाटील जे. एस. कदम बी. जे. 2011) म्हणजे विकासाचा गाभा हा शेती म्हणून ज्या ज्या योजना आहेत त्या योजनेनुसार सुधारणा घडवून आणल्या गेल्या यातून अपेक्षित बदल झाले होते.

सन 1991 मध्ये भारतीय अर्थव्यवस्थेला दिशा देण्यासाठी नवीन आर्थिक धोरणाचा स्वीकार केला. या धोरणामध्ये जागतिकीकरण हे महत्वाचे धोरण मानले गेले. तात्या स्थितीमध्ये जागतिकीकरणामुळे आज ग्रामीण समाजासमोर आर्थिक आव्हाने उभी राहिली आहे. त्यामध्ये रोजगार हा महत्त्वाचा मानला असल्याकारणाने आज ग्रामीण भागात बेकारीचे प्रमाण वाढ झाली आहे, हे चिंताजनक बाब आहे. जागतिकीकरणामुळे विकासाची फळे सर्वांपर्यंत पोहोचले पाहिजे आणि संधीची समानता उपलब्धता करून दिली पाहिजे. हे जरी खरे असले तरी, "भारत सरकारच्या सेंट्रल स्टॅटिस्कल ऑर्गनायझेशनच्या आकडेवारीनुसार 1993-94 ते 2001-02 मध्ये एकूण रोजगार दर साल दर शेकडा 0.08% दराने कमी होत गेला. सार्वजनिक क्षेत्रात एकूण रोजगारातील हिस्सा 73.3% वरून

69.00% पर्यंत कमी झाला तर खाजगी क्षेत्राचा हिस्सा 28.97% वरून 30.99% पर्यंत वाढला. (डॉ. खांदेवाले श्रीनिवास, 2005, पान क्रमांक 169) यामुळे देशातील आर्थिक विकासाचे निर्देशक याबाबत असमतोल वाढत असून आर्थिक विषमता ही आजही टिकून आहे.

जागतिकीकरणाच्या व्यवस्थेमध्ये आर्थीक घटकांकडे लक्ष देणे गरजेचे आहे. हे मांडले असले तरी राष्ट्रीय उत्पन्न व्यवस्थेमध्ये "रोजगार निर्मिती, दारिद्य निर्मूलन, जमीन व पाण्याचे समन्यायी वाटप, शेतकऱ्यांच्या आत्महत्या, उपोषण व कुपोषणामुळे मुलांचा बळी, शिक्षण, आरोग्य सेवा, शेतमजूर अल्पभूधारक अं पर्यंत विकास आणि विकास योजना पोहोचत नसल्यामुळे ग्रामीण दारिद्र टिकून राहणे, कृषी विकास व औद्योगिक विकास यातील विकास असमतोलामुळे वाढती विषमता." (डॉ. खांदेवाले श्रीनिवास, 2005, पान क्रमांक 174) तेव्हा रोजगारात महत्त्वाचा आधार हा रोजगार व उत्पन्न असतो पण जागतिकीकरणामुळे मधील शेतीचा विकास महत्त्वाचा मानून शेतकऱ्यांच्या विकासाचा हे विचार केला. यामध्ये अल्पभूधारक, शेतमजूर, कोरडवाहू शेतकऱ्यांचे उत्पन्न कसे वाढेल याकडे लक्ष दिले असले तरी "जागतिकीकरणाने उद्योग क्षेत्रातील रोजगार घटला आणि सेवा क्षेत्राने सर्वांना सामावून घेतले नाही. परिणामी बेरोजगारी वाढत गेली." (खातू गजानन 2005, पान क्रमांक 189) यामुळे आजच्या ग्रामीण समाजातील युवा वर्गासमोर बेरोजगारीचा प्रश्न वाढत आहे. " जागतिकीकरणामुळे बाजाराधिष्ठित खुली स्पर्धा निर्माण झाली.

प्रगत देशातील आयात शेत मला बरोबर स्पर्धा करणे भारतीय शेतकऱ्यांना सध्या तरी शक्य नाही. कारण भारतातील शेती व्यवसाय प्रामुख्याने ध्येयधोरणाने, लहरी मौसमी हवामान यावर अवलंबून आहे, यातच भर म्हणून जागतिकीकरणाचा फार मोठा विपरीत परिणाम होण्याची भीती आहे" (सूर्वे 2004, पान क्रमांक 30-38) यातून ग्रामीण समाजामध्ये आर्थिक व सामाजिक विषमता, ग्रामीण दारिद्य, बेरोजगारी, शेती क्षेत्रावर प्रभाव कृषी बाजारांमध्ये स्पर्धा राजकीय उदासीनता या घटकांचा विचार केला तर ग्रामीण समाजामध्ये या आव्हानांना सामोरे जावे लागते. जागतिकीकरणामध्ये महत्वाचे प्रश्न दूर होतील असे म्हटले असले तरी ग्रामीण समाजामध्ये संकट निर्माण झाले असे म्हणावे लागेल. याचे कारण जागतिकीकरणामध्ये ग्रामीण शेतकरी हा कर्जबाजारी होऊन तो आत्महत्या करू लागला हे जरी खरे असले तरी ग्रामीण समाजामध्ये खालील घटक आव्हानात्मक ठरत आहे.

**आर्थिक व सामाजिक विषमता**

आज ग्रामीण समाजामध्ये अर्थाजनाची संधी नाही त्यामुळे ग्रामीण समाजामध्ये आर्थिक विषमता ही फार मोठ्या प्रमाणात दिसून येते, शेती व्यवसायात जमीन हे उत्पन्नाचे साधन असले तरी वितरणामध्ये मोठी विषमता आहे. तसेच मोठ्या शेतकऱ्यांनी शेती सुधारण्याचे फायदे आपल्याकडे घेऊन स्वतःवर फायदा करून घेतला. त्यामुळे बहुसंख्य शेतकरी अल्पसूधारक आहेत. आजही शेतकरी हे परंपरागत पद्धतीने शेती करतात अल्पसुधारक व भूमिहीन शेतमजूर यांना रोजंदारीवर काम करून आर्थिक घटकांना सामोरे जावे लागत आहे. जागतिकीकरणामुळे बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या शेती क्षेत्रामध्ये प्रवेश झाला. शेतीचा दर एकरी उत्पादन क्षमता वाढेल. भारतीय शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ खुली होऊन उत्पन्न वाढेल अशा अपेक्षेने जागतिकीकरणाची अंमलबजावणी झाली. पण शेती विषयक

समस्या हा अधिकृत जातील होऊन ग्रामीण अर्थव्यवस्था कोलमडू लागली. यातून आर्थिक विषमता वाढू लागली. गरिबांना शिक्षण घेण्याची संधी मिळणे कठीण होते आणि शिक्षण घेतले तरी नोकरी मिळणे ही कठीण आहे. संपत्तीतील व उत्पन्नातील विषमतेमुळे सामाजिक संघर्ष वाढून बर्ग विग्रह निर्माण होतो यातून आर्थिक अस्थिरता निर्माण होते या दुष्परिणामामुळे ग्रामीण समाजामध्ये काही समाजातील समाजगटांना वंचित ठेवून विकासाच्या प्रवाहामध्ये त्यांना अन्य जात नाही यामुळे सामाजिक विषमतेचा मुद्दा हा महत्त्वाचा ठरतो.

**दारिद्य**

"जय लोक आपल्या दैनंदिन जीवनात जीवनाची किमान पातळी गाठू शकत नाही त्यांना दारिद्य किंवा गरीब असे संबोधले जाते." (डॉ. देसाई य. श्री. मु. डॉ. सौ. भालेराव निर्मल, पान क्रमांक 4.24) तेव्हा व्यक्तिंना जगण्यासाठी किमान पातळीची गरज असते. भारतात नियोजन मंडळाने दारिद्यरेषा निश्चित केले आहे. ग्रामीण लेटेस्ट रोज 2400 उष्माकांची गरज आहे. पण ग्रामीण समाजामध्ये अल्पभूधारक, भूमिहीन शेतमजूर, जागतिकीकरणामुळे रेशीम आलास ग्राहक न मिळाल्याने बेकार झालेले कारागीर, करताना फेडू शकणारे शेतकरी तसेच शेती ही पावसावर अवलंबून असल्यामुळे तसेच निसर्गातील होणाऱ्या घडामोडी यामुळे शेतीचे उत्पन्न हे कमी प्रमाणात येत असल्यामुळे ओला व कोरडा दुष्काळ यामुळे ग्रामीण समाजातील लोकांना दारिद्य सामोरे जावे लागत आहे.

**बेरोजगार**

"कोणत्याही अर्थव्यवस्थेच्या वाढीचा वेग व रोजगार गाडीचा वेग यांचा परस्पर संबंध असतो याला रोजगाराची लवचिकता म्हणतात." (खातू गजानन, 2005, पान क्रमांक 102) रोजगार हा औद्योगिक क्षेत्रावर शेती क्षेत्रासाठी तोडला असला तरी जागतिकीकरणामुळे ग्रामीण भागातील लोकांना रोजगार मिळेल नका झाला आहे कारण श्रमशक्ती घडविणारे तंत्रज्ञानाने आणि उत्पादकता वाढवली आहे. कारखान्यांमध्ये काम करणारे कामगार कमी होत आहेत तसेच ग्रामीण उद्योगही अडचणीत येऊन ग्रामीण भागातील क्रयशक्ती चे हस्तांतर शहरांमध्ये होत आहे. नवीन आर्थिक धोरणांचा परिणाम हा बेरोजगार वाढवत आहे. ग्रामीण बेकारी कमी करण्यासाठी शासनाने अनेक कार्यक्रम व योजना राबविल्या आहेत पण ते कागदपत्रे पूर्ण झाल्याचे दाखवले जात आहे आणि त्याचा लाभ आर्थिक दृष्ट्या दुर्बलांना न होता श्रीमंत शेतकऱ्यांना लाभ होत असतो अशा स्थितीत अल्पशिक्षितांची वाढती बेरोजगारी ही आज समस्या तीव्र होत आहे.

**शेती क्षेत्रावर परिणाम आणि कृषी बाजारांमध्ये स्पर्धा**

जागतिकीकरण आकडे देशाचा जलद विकासाच्या दृष्टीने पाहिले तर करारात सहभागी झाल्यानंतर कराराचे समर्थक, अर्थशास्त्रज्ञ व राजकीय म्हणतात की, "जगातील देशांना भारतात विविध नैसर्गिक साधन सामुग्री किफायतशीर दरात मिळेल. भारतातून शेती उत्पादनाची निर्यात वाढेल. शेतीमालाच्या आंतरराष्ट्रीय बाजारातील किमती भारतीय बाजारातील किमती पेक्षा अधिक आहे. भारतास परकीय चालना मिळेल. जागतिकीकरणाच्या अंमलबजावणी नंतरच्या काळात भारतीय शेतीच्या समस्या कमी होण्याऐवजी अधिक तिव्र होत गेल्यास जो शेतीमाल देखील या देशात मुबलक प्रमाणावर दिसतो तो शेतीमाल या देशात खुले आम बाहेरून येत राहिल्याने

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

शेतीवर अवलंबून असणाऱ्या छोटे शेतकरी, कामगार व त्यांची कुटुंबे यांच्या भवितव्याचा प्रश्न बिकट झाला आहे. शेतकऱ्यांना बाजारपेठ मिळणे तर दूरच स्वतःची हक्काची बाजारपेठ मिळेनाशी झाली आहे. त्याचप्रमाणे शेतीतील अस्थिरता वाढल्यामुळे लहान शेतकरी जागतिक स्पर्धेमध्ये व बाजारपेठेच्या क्षेत्रातून बाहेर फेकले जात आहे. ग्रामीण समाजातील लहान शेतकरी जागतिक व स्थानिक विषमतेला तोंड देत आहे या विषमतेमुळे त्यांच्या किमान जगण्यावरचा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. (डॉ. बनसोडे प्रशांत, 2008, पान क्रमांक 121) यामुळे शेती क्षेत्रावर परिणाम व कृषी बाजारामुळे ग्रामीण समाजशास्त्र हे आर्थिक आव्हान ठरत आहे.

**राजकीय हस्तक्षेप**

जागतिकीकरण हे संकल्पनांचा बाजाराधिष्ठित असले तरी त्यातून एक नवी समाज व्यवस्था उदयास आली. कारण लोकशाही ही लोकांची असते त्यांचे राजकीय निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य लोकांना असते पण राजकीय हस्तक्षेपामुळे लोकशाहीमध्ये विसंगती आहे राष्ट्रातील कंपन्यांचे हितसंबंध व बाजारपेठेतील वर्चस्व यामुळे लोकसत्ताक प्रशासन यांची शक्ती नाहीशी होते. अविकसित राष्ट्राचे स्वतःची आर्थिक धोरणे ठरविण्याची शक्तीचे कमी झालेले असते तेव्हा ही विकसित राष्ट्रे, परकीय मदत, नाणेनिधी आणि जागतिक बँकेची कर्ज या रुपाने वर्चस्व ठेवत असतात. यामुळे सत्ताधाऱ्यांची सत्तेवर राहण्याची व आपले सामर्थ्य वाढविण्याची क्षमता यामध्ये हितसंबंध गुंतलेले. "लहान शेतकरी वर्गाला कृषी निधी मिळायच्या प्रक्रियेमधील मोठ्या शेतकऱ्यांच्या वाढत्या राजकीय हस्तक्षेपामुळे शासकीय मदतीचा कसला फायदा झाला नाही सहकारी सोसायट्या, बँका आणि विभागावर यावरच शेतकरी वर्गाचे नियंत्रण असल्यामुळे त्यावर त्यांची मक्तेदारी बनली". (डॉ. बनसोडे प्रशांत, 2008, पान क्रमांक115) जागतिकीकरणानंतर भारतीय समाजात लोकशाही दिसत असली तरी खरीखुरी लोकशाही नाही तर आर्थिक तेने संपन्न असलेल्या विकसित राष्ट्रांचे बाहुले आहे की काय, अशा स्वरूपाचा प्रश्न निर्माण होतो.

**संशोधन समस्या**

ग्रामीण समाजाचा व्यवसाय शेती असल्याने शेतीवर आधारित व्यवसाय होते. ग्रामीण समाजावर औद्योगिकीकरण, आधुनिकीकरण, नागरीकरण, पाश्चातीकरण व जागतिकीकरण या सर्व घटकांचा प्रभाव पडला आणि त्या त्या कालखंडात ग्रामीण समाजाला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. भारताने जागतिकीकरणाचा स्वीकार केला आणि आज घर आणि समाजाचा चेहरामोहरा बदलला पण या जागतिकीकरणामध्ये आजच्या ग्रामीण समाजात आर्थिक आव्हाने मोठ्या प्रमाणात उभी आहेत. कारण ग्रामीण समाज शेती, व इतर व्यवसाय गुजरात करणाऱ्या आहे पण आज जागतिक पातळीवर शेती व इतर व्यवसाय संपुष्टात येऊन ग्रामीण समाजाला आर्थिक आव्हानांना कोणत्या प्रकारे सामोरे जावे लागते. शेतीतून मिळणारे उत्पन्न, कर्ज आणि कुटुंबाचा खर्च आणि ग्रामीण समाजातील आर्थिक स्थितीतील बदल या बाबीचा विचार सदरच्या संशोधनातून अपेक्षित आहे.

**संशोधनाची उद्दिष्टे**

1. जागतिकीकरणामध्ये शेती क्षेत्रावर झालेला परिणाम.
2. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत घडून आलेले बदल अभ्यासणे.

3. जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजासमोरील आर्थिक आव्हाने अभ्यासणे

**अभ्यास क्षेत्र**

सदर शोधनिबंधात साठी सांगली जिल्ह्यातील कांचन पूर्व सोनी या ग्रामीण भागाची निवड केले आहे.

**नमुना निवड**

कांचन पूर्ववत सोनिया ग्रामीण समाजाचे निवड करून यामध्ये एकूण 100 कुटूंबाचे नमुना निवड पद्धतीच्या आधारे निवड केली आहे. या नमुन्यामध्ये जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत आर्थिक आव्हानातील वास्तवता अभ्यासले आहे.

**अनुसूची तंत्र**

प्रस्तुत शोधनिबंध अधिक सुषमा व वस्तुनिष्ठ व्हावा याकरिता शोधनिबंधात यासंदर्भात जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजाला शेतीशी संबंधित माहिती आणि आर्थिक बदलानुसार आव्हाने कोणती हे अभ्यासले आहे. याकरिता अनुसूची च्या आधारे संबंधित उत्तर दात्यांच्या मुलाखती घेऊन माहिती संकलित केली आहे.

**तक्ता क्रमांक 1 कुटुंबाच्या प्रकारानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | कुटुंबाचा प्रकार | प्रतिसादकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | संयुक्त कुटुंब | 65 | 65% |
| 2 | विभक्त कुटुंब | 35 | 35% |
| | एकूण | 100 | 100% |

वरील तक्ता क्रमांक 1 नुसार असे दिसून येते की ग्रामीण समाजामध्ये 65 संयुक्त कुटुंब जरी दिसून येत असले तरी काही कुटुंबाच्या राहण्याच्या जागा वेगवेगळ्या दिसून येतात तसेच 35% विभक्त कुटुंब वरून असे लक्षात येते की ग्रामीण समाजामध्ये औद्योगिकीकरण नागरीकरण यांचा प्रभाव तसेच नोकरीच्या निमित्ताने कुटुंबे विभक्त झालेले अस्तित्वात येतात तसेच संयुक्त कुटुंबात 23 पिढीचे लोक एकत्र होते हे चित्र आज दिसून येत नाही फक्त एका पिढीचे लोक एकत्रित दिसून येतात तसेच गावाची जत्रा, सण, समारंभ या कार्यक्रमाच्या निमित्ताने ही कुटुंबे एकत्र येऊन कार्य करीत असतात.

**तक्ता क्रमांक 2 शिक्षणानुसार वर्गीकरण**

| अ. क्र. | शिक्षण | प्रतिसादकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | अशिक्षित | 09 | 9% |
| 2 | प्राथमिक | 30 | 30% |
| 3 | माध्यमिक | 28 | 28% |
| 4 | उच्च माध्यमिक | 12 | 12% |
| 5 | पदवीधर | 21 | 21% |
| | एकूण | 100 | 100% |

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

तक्ता क्रमांक 2 नुसार असे दिसून येते की, सर्वाधिक शेतकरी प्राथमिक शिक्षण घेतलेले 30 % इतके आहे तर पदवीनंतर शिक्षण घेतलेला शेतकऱ्यांचे प्रमाण 21 % इतके आहे अशिक्षित शेतकऱ्यांचे प्रमाण 9% असून उच्च व माध्यमिक व माध्यमिक शिक्षण घेतलेल्याचे प्रमाण 12 % व 28 % इतकी आहे. पदवीपर्यंत शिक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांचे प्रमाणानुसार वर्गीकरण केले तर शिक्षणातून कोणत्याही प्रकारची नोकरी नाही तसेच कोणत्याही शेतकऱ्यास कृषी शिक्षण घ्यावे असे वाटले नसेल पण बहुसंख्य शेतकऱ्यांचा कल हा शेती करण्याकडे अधिक आहे.

**तक्ता क्रमांक 3 शेती करण्याच्या पद्धती**

| अ. क्र. | शेती करण्याच्या पद्धती | प्रतिसादक | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | परंपरागत | 67 | 67% |
| 2 | आधुनिक | 33 | 33% |
| | एकूण | 100 | 100% |

तक्ता क्रमांक 3 नुसार आजही ग्रामीण समाजामध्ये परंपरागत पद्धतीने शेती करण्याचे प्रमाण 67% आहे आणि आधुनिक पद्धतीने ते 33% शेतकरी शेती करत आहे. यावरून असे दिसून येते की, ग्रामीण समाजातील 33% शेतकरी हे श्रीमंत आहेत तसेच त्यांना आधुनिक तंत्रज्ञान, बी -बियाणे सिंचन व्यवस्था, रासायनिक खते यांची माहिती व त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे, तसेच 67% शेतकऱ्यांची स्थिती बेताची असल्यामुळे त्यांना नवीन आधुनिक पद्धतीचा वापर करू शकत  नाहीत.

**तक्ता क्रमांक 4 शेतीचा प्रकार**

| अ. क्र. | शेतीचा प्रकार | प्रतिसादकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | जिरायती | 72 | 72% |
| 2 | बागायती | 28 | 28% |
| | एकूण | 100 | 100% |

तक्ता क्रमांक 4 नुसार जिरायती पिकांचे लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक 72% इतके आहे. तर बागायती पिकांची लागवड शेती शेतकऱ्यांचे प्रमाण अत्यंत कमी 28% इतके असल्याचे दिसून येते. कारण बहुसंख्य शेतकरी ज्वारी, गहू, कडधान्ये अधिक प्रमाणात ही पिके घेतात. फळे, भाजीपाला ही पिके घेण्याकडे कल कमी असल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक 5 पिकांचा प्रकार**

| अ. क्र. | पिके | प्रतिसादकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | खरीप | 37 | 37% |
| 2 | रब्बी | 59 | 59% |
| 3 | नगदी | 04 | 4% |
| | एकूण | 100 | 100% |

तक्ता क्रमांक 5 नुसार, ग्रामीण समाजातील शेती ही पावसावर अवलंबून असल्याने 37% लोक खरीप पिके घेतात. त्या पुढील हंगामातील पिके ही शक्यतो कमी लोक रब्बी पिके घेतात ही पिके शक्यतो पाण्याची सोय चार शेतकऱ्यांकडे आहे ते शेतकरी घेतात आणि 4% लोक हे नगदी पिके घेतात ग्रामीण समाजामध्ये नगदी पिके घेणारे शेतकरी खूप कमी आहेत, कारण नदी पिकांना पाण्याची गरज असते .

**तक्ता क्रमांक 6 शेतीविषयक योजनांचा लाभ**

| अ. क्र. | योजनांचा लाभ | प्रतिसादक लाभ घेताना | लाभ घेत नाही |
|---|---|---|---|
| 1 | शेती कर्ज पुरवठा | 27 (27%) | 73 (73%) |
| 2 | पिक विमा योजना | 23 (23%) | 77 (77%) |
| 3 | शेती अनुदान योजना | 31 (31%) | 69 (69 %) |
| 4 | सहकारी शेती योजना | लागु नाही | लागु नाही |
| 5 | किसान कार्ड योजना | 04 (4%) | 96 (96%) |
| 6 | शेततळी योजना | 08 (8%) | 92 (92%) |
| 7 | ठिबक सिंचन योजना | 07 | 93 |

वरील तक्त्यानुसार, ग्रामीण समाजातील शेतकऱ्यांना शेतीविषयक योजनांची माहिती आहे, पण केवळ सहकारी शेती ही योजना माहित असून त्यांचा लाभ घेतलेला नाही. हे दिसून येते किसान कार्ड योजना आहे शेतकऱ्यांच्या आर्थिक घटकाला दिलासा आहे. पण 96% शेतकऱ्यांनी त्याचा लाभ घेतलेला नाही. या योजनांचा केवळ 4% इतक्या लोकांनी लाभ घेतलेला आहे. ठिबक सिंचन योजना व शेतकरी योजना याविषयी जेथे पाण्याची सोय आहे, तिथल्या शेतकऱ्यांना त्याचा लाभ झालेला दिसून येतो. पण शेतीसाठी कर्ज योजना आहे. त्यांचा केवळ 27% इतक्या शेतकऱ्यांनी लाभ घेतलेला आहे 73% शेतकरी हे श्रीमंत आणि शेत मजूर माध्यम शेतकरी असल्याने त्यांचा लाभ केवळ 27% इतक्या शेतकऱ्यांनी घेतलेला आहे. पिकांचे नुकसान झाले तर पिक भरपाई म्हणून ते कामगार विमा दिला जातो त्याचा लाभ केवळ 23% इतके घेतानाच दिसून येतात शेती अनुदान योजना ही सर्व ग्रामीण भागात सुरू आहे पण 31% शेतकऱ्यांपर्यंत हे अनुदान असल्याचे दिसले 69% शेतकऱ्यांपर्यंत होते अनुदान मिळत नसल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक 7 शेती उत्पादनातील वाढ**

| अ. क्र. | शेती उत्पादनातील वाढ | प्रतिसाद कांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | उत्पादनात वाढ झाली | 33 | 33% |
| 2 | उत्पादनात वाढ नाही | 64 | 64% |
| 3 | थोड्याफार प्रमाणात | 03 | 3% |
| | एकूण | 100 | 100% |

तक्ता क्रमांक 7 नुसार, समाजा जागतिकीकरणामध्ये उत्पादन वाढण्याचा कल होता, परंतु वरील तक्त्यानुसार 33% शेतकरी आधुनिक पद्धतीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झालेली दिसून येते. तसेच आधुनिक पद्धतीने शेती करून परंपरागत पद्धतीने शेती केली असल्यामुळे 64% शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ नाही. तसेच

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

03% शेतकऱ्यांच्या उत्पादनात थोड्याफार प्रमाणात आहेत. त्यामुळे एकूण 67% शेतकऱ्यांना आर्थिक घटकांना सामोरे जावे लागत आहे.

**जागतिकीकरणामुळे ग्रामीण शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीतील बदल:**

**तक्ता क्रमांक 8 शेतीतून मिळणारे वार्षिक उत्पन्न**

| **अ. क्र.** | **शेतीतून मिळणारे उत्पन्न** | **प्रतिसादक** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1 | 50 हजारांच्या आत | 40 | 40% |
| 2 | 50 हजार ते 1 लाखाच्या आत | 27 | 27% |
| 3 | 1 लाख ते 5 लाखाच्या आत | 33 | 33% |
| 4 | 5 लाखापेक्षा जास्त | 00 | 0% |
| | एकूण | 100 | 100% |

गतिकीकरणामुळे शेती उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारेल तसेच त्यांच्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठ मिळेल अशी अपेक्षा होती परंतु तक्ता क्रमांक 8 नुसार 50 हजारांच्या आत शेतीतून वार्षिक उत्पन्न मिळणार या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक 40% आहे 50 हजार ते 1 लाखाच्या आत आत वार्षिक उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 27% इतके असून 1 लाख ते 5 लाखाच्या आत उत्पन्न असणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण 33% इतके आहे तर 5 लाखापेक्षा जास्त उत्पन्न कोणत्याही शेतकऱ्याचे नसल्याचे दिसून येते.

**तक्ता क्रमांक 9 आर्थिक स्थितीतील बदल**

| **अ. क्र.** | **आर्थिक स्थितीतील बदल** | **प्रतिसादक** | **टक्केवारी** |
|---|---|---|---|
| 1 | आर्थिक स्थिती सुधारली आहे | 33 | 33% |
| 2 | आर्थिक स्थिती सुधारली नाही | 64 | 64% |
| 3 | जशी आहे तशी आहे | 03 | 3% |
| | एकूण | 100 | 100% |

वरील तक्त्यानुसार, जागतिकीकरणाच्या ग्रामीण समाजातील शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीवर परिणाम दिसून येतो. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली नाही म्हणणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रमाण सर्वाधिक आहे. तर आर्थिक स्थिती सुधारली म्हणणा-यांचे प्रमाण 33% इतके आहे आणि त्यांच्या उत्पादन वाढत थोड्याफार प्रमाणात झाली आहे. अर्थात त्यांची स्थिती जशी आहे तशी आहे त्यांचे प्रमाण 3% इतके आहे. वरील तक्ता नुसार जागतिकीकरणाचे शेतीवर अनेक परिणाम होत आहे. शेती व शेती करणाऱ्यांच्या पद्धती बदलत आहेत. जागतिकीकरणामुळे अनेक प्रकारचे नवनवीन बी बियाणे, पिकांवर पेंटट तसेच आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील मागणी कमी, त्यामुळे शेतकऱ्यांच्या मालाला मागणी कमी, तसेच जागतिक हवामानाचा फार मोठा परिणाम शेती उत्पादनावर होत आहे. या कारणाने शेतकऱ्यांना आर्थिक आव्हानांना फार मोठे तोंड द्यावे लागत आहे.

**निष्कर्ष**

शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा पाया आहे. त्यामुळे भारतातील सुमारे 61% संख्या शेतीवर उपजीविका करते. बहुसंख्य लोकसंख्या शेती व्यवसायात गुंतलेले आहे. ग्रामीण समाज हा शेतीशी निगडित असल्याने ग्रामीण

अर्थव्यवस्थाही शेतीशी संबंधित आहे. त्यामुळे ग्रामीण समाजाला आर्थिक घटकाला वारंवार सामोरे जावे लागते. आजची शेती आधुनिक बनली आहे. नवनवीन तंत्रज्ञानाची अवलंब करून शेतीतून उत्पादन घेतले जाते. पण ग्रामीण समाजातील सर्व शेतकऱ्यांना त्याचा लाभ होईल असे नाही. त्यामुळे सदर शोधनिबंध आतून जागतिकीकरणामुळे ग्रामीण समाजाला आर्थिक आव्हानांना सामोरे जावे लागते याचा अभ्यास करून शेतीशी संबंधित आर्थिक माहिती घेऊन काही महत्त्वपूर्ण निष्कर्ष हाती आले आहेत.

1. जागतिकीकरणामुळे आधुनिक शेती उदयास आली असली तरी अजूनही पारंपारिक पद्धतीने शेती करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे.

2. जागतिकीकरणामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सुधारणा होऊन ग्रामीण समाज हा प्रकाशन होईल याकरिता प्रयत्न झाले पण ग्रामीण समाजाचे आर्थिक स्थिती सुधारली आहे.

3.ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या मालाला आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत जात नाही.

4. ग्रामीण समाजातील युवक शिक्षण घेतात पण ते शिक्षण घेऊन आजही शेती करतात शिक्षणातून व्यक्तीचा विकास होतो असे समजले जाते पण पदवी असूनही आज ग्रामीण युवकांपुढे नोकरीचा प्रश्न आहे.

5. शेती विषयक ज्या ज्या योजना आहेत त्या योजनांचा अनुदान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही.

**शिफारशी**

1. आज बहुसंख्य शेतकरी पारंपरिक पद्धतीने शेती करतात त्यांच्या उत्पादनात वाढ झालेली दिसत नाही, म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाने शेती करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रवृत्त केले पाहिजे.

2. शेतकऱ्यांची आर्थिक स्थिती सुधारली तरच ग्रामीण समाज हा देशाच्या प्रगतीवर जाऊन पोहोचेल याकरिता शासनाने वेगवेगळ्या योजना आखल्या आहेत त्या प्रत्येक शेतकऱ्यांपर्यंत पोहोचल्या पाहिजेत.

3. ग्रामीण समाजातील युवकांकडे शिक्षण आहे, पण नोकरी नाही तर अशा युवकांना उद्योग धंदा किंवा लघुउद्योग सुरू करण्यासाठी शासनाने प्रोत्साहन आणि आर्थिक मदत केली पाहिजे.

**सारांश**

जागतिकीकरणामुळे शेती करण्याच्या पद्धतीत खूपच बदल घडून येतील असे जरी वाटत असले तरी जागतिकीकरणामुळे शेती व्यवस्थेमध्ये बदल झालेले दिसून येत नाही. कारण आजही मोठ्या प्रमाणात शेतकरी पारंपरिक पद्धतीने शेती करतात. शेतकरी हा अशिक्षित लिहिता-वाचता येईल इतके शिक्षण घेतलेला असल्यामुळे आधुनिक पद्धतीने शेती विषयी म्हणावे इतके ज्ञान नाही ज्यांना आधुनिक शेतीचे ज्ञान आहे त्यांनी स्वीकार केला आहे, त्यांच्या उत्पन्नात वाढ ही कमी जास्त प्रमाणात दिसते.

शेती सुधारणा केली तरच ग्रामीण समाजाचा विकास होतो म्हणजेच ग्रामीण समाजाचा पाया हा आर्थिक आहे त्यामुळे हा पायात सद्यस्थितीमध्ये ग्रामीण समाजाला आव्हानात्मक ठरत आहे, कारण जागतिकीकरणातील सर्व घटकांचा परिणाम हा ग्रामीण समाजासमोर पडत आहे. म्हणून ब्राह्मण समाज आर्थिक आव्हानांना तोंड देत जगत आहे.

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

## संदर्भ ग्रंथ सूची

*पाटील जे. एस. कदम बी. जे. 2011 महाराष्ट्राच्या ग्रामीण विकासात ग्रामपंचायतीचे योगदान, अर्थसंवाद, अंक -2.*
*डॉ. खांदेवाले श्रीनिवास "स्वातंत्र्योत्तर भारतातील विकास व त्यातून निर्माण झालेले प्रश्न" संपादन- डॉ. मोरे चंद्रकांत व इतरः विकास वाटचाल आणि समस्या 2005, प्रकाशक, समतादर्शन प्रतिष्ठान बार्शी, पान क्रमांक 169.*
*उपरोक्त क्रमांक 2, पान क्रमांक 174.*
*खातू गजानन, स्वातंत्र्योत्तर आर्थिक धोरणाचे परिणाम संपादन- डॉ. मोरे चंद्रकांत व इतर, विकासः वाटचाल आणि समस्या 2005 प्रकाशक, समतादर्शन प्रतिष्ठान बार्शी, पान क्रमांक 189.*
*सुर्वे जी. पी. 2004, जागतिकीकरणाचा शेतीवर झालेला परिणाम, योजना मासिक अंक 11, पान क्रमांक 30-38.*
*डॉ. देसाई य. श्री. मु. सौ. भालेराव निर्मल, भारतीय अर्थव्यवस्था निराली प्रकाशन, पान क्रमांक 4.24.*
*उपरोक्त क्रमांक 4, पान क्रमांक 202.*
*डॉ. बनसोडे प्रशांत, जागतिकीकरण आणि शेतकऱ्यांच्या आत्महत्या संपादक, कराडे जगन 2008 जागतिकीकरण भारतासमोरील आव्हाने, डायमंड पब्लिकेशन, पान क्रमांक 121.*
*उपरोक्त क्रमांक 8, पान क्रमांक 115.*

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*